महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २६२ वा | दिनांक : १४/०८/२०२५ | वार : गुरूवार

## शरद पवार सरकारनेच कत्तलखाने बंदीचा निर्णय आणला होता



**मुंबई :** १५ ऑगस्ट रोजी कत्तलखाने बंद ठेवण्याच्या निर्णयावरून भाजपने महाविकास आघाडीवर जोरदार पलटवार केला आहे. १५ ऑगस्ट रोजी कत्तलखाने बंद ठेवण्याचा निर्णय हा महायुती सरकारने घेतलेला नाही. हा निर्णय १२ मे १९८८ रोजी शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री असताना व काँग्रेस सत्तेत असताना घेण्यात आला होता. त्यानंतर शरद पवार मुख्यमंत्री झाल्यानंतर या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली, असे भाजपने म्हटले आहे.

राज्यात सध्या १५ ऑगस्ट रोजी कत्तलखाने बंद ठेवण्याच्या मुद्यावरून रान पेटले आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड व रोहित पवार तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. या पार्श्वभूमीवर भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी महाविकास आघाडीवर जोरदार पलटवार केला आहे.

केशव उपाध्ये या प्रकरणी बोलताना म्हणाले, काय खाव काय खाऊ नये, याचा निर्णय सरकारने करूच नये या बद्दल दुमत नाहीच फक्त विविधतेत एकता असणाऱ्या आपल्या देशातील विविध समाजांच्या भावनांचा आदर सर्वांनीच ठेवला पाहिजे अशी भाजपाची भूमिका आहे. १५ ऑगस्ट रोजी कत्तलखाने बंद ठेवण्यावरून महायुती सरकारवर आगपाखड करणारे आदित्य ठाकरे व जितेंद्र आव्हाड हे १५ ऑगस्ट कत्तलखाना बंदी साठी शरद पवारांचा निषेध करणार का? विरोध करणार का? त्यांना जाब विचारणार का? हा खरा प्रश्न आहे.

कारण १५ ऑगस्ट रोजी कत्तलखाने बंद ठेवण्याचा निर्णय हा महायुती सरकारने घेतलेला नसून १२ मे १९८८ रोजी शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री असताना व काँग्रेस सत्तेत असताना घेतलेला निर्णय आहे. त्यानंतर महिनाभरातच शरद पवार मुख्यमंत्री झाल्यापासून हा १५ ऑगस्टचा कत्तलखाने बंदचा निर्णय पहिल्यांदा अंमलात आणला गेला. एवढंच काय मविआ सरकारमध्ये २/३ वर्षांपूर्वी हे दोघेही मंत्री असतानासुध्दा १५ ऑगस्ट ला कत्तलखाने बंद ठेवण्यात आले होते, तेव्हा त्या विरोधात एक शब्दही हे दोघेही बोलले नाहीत.

पण जितेंद्र आव्हाड व आदित्य ठाकरे यांना विस्मरणाचा आजार जडला असे म्हणणार नाही. कारण पक्ष व सत्ता गेल्याने सारासार विवेक गमावून नैराश्यात असलेल्या आव्हाड व ठाकरेंकडून अर्थात सरकारच्या प्रत्येक कृती विरोधात बोलण्याव्यतिरिक्त वेगळी अपेक्षाच जनता करीत नाही. महायुती सरकारने सूर्य पूर्वेला उगवतो असे म्हटले तरी हे लोक त्याला विरोध करतील.

प्रशासनावर उत्तम पकड असणाऱ्या तसेच महायुतीत उपमुख्यमंत्री असणाऱ्या व आता १५ ऑगस्टच्या मांसबंदीच्या निर्णयाला विरोध नोंदविणाऱ्या अजित पवार यांनाही हा निर्णय महायुती सरकारमध्ये झालाच नाही याची माहिती असणारच याबद्दल शंका नाही, असे केशव उपाध्ये यांनी म्हटले आहे.

## एकनाथांमुळेच महायुतीची सत्ता आली - मंत्री उदय सामंत



**अमरावती :** शिवसेनेचे सर्वेसर्वा एकनाथ शिंदे यांच्यामुळेच महाराष्ट्रात पुन्हा महायुतीचे सरकार आल्याचा दावा राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केला आहे. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना वेगवेगळ्या योजना आणल्या. या योजनांमुळेच सकारात्मक वातावरण निर्मिती होऊन राज्यात महायुतीची सत्ता आली. हे सत्य कुणीच नाकारू शकत नाही, असे ते म्हणालेत. सामंत यांच्या या दाव्यामुळे महायुतीतील घटकपक्षांत वाद होण्याची शक्यता आहे.

मंत्री उदय सामंत बुधवारी एका कार्यक्रमासाठी अमरावतीत आले होते. तत्पूर्वी, नागपूर विमानतळावर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी एकनाथ शिंदे यांच्यामुळेच राज्यात महायुतीचे दुसऱ्यांदा सरकार आल्याचा दावा केला. उदय सामंत म्हणाले, एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना राज्यात वेगवेगळ्या योजना आणल्या. या योजनांमुळे महाराष्ट्रात एक सकारात्मक वातावरण तयार झाले. त्यामुळे राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आली. हे कुणीच नाकारू शकत नाही. यात भाजपला डिवचण्याचे किंवा वाद निर्माण करण्याचे कोणतेही कारण नाही. माझ्या वक्तव्यात कोणताही विपर्यास करणारा शब्द नाही किंवा मी श्रेय लाटण्यासाठीही बोलत नाही.

उदय सामंत यांनी यावेळी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या कार्यक्रमात उद्धव ठाकरे यांना शेवटच्या रांगेत बसवण्यात आल्याचाही पुनरुच्चार केला. आमचे नेते एकनाथ शिंदे दिल्लीला जातात, तेव्हा ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खुर्चीला खुर्ची लावून बसतात. पण उद्धव ठाकरे यांना काँग्रेसच्या बैठकीत शेवटच्या रांगेत बसवण्यात आले. यावरून त्यांची कुवत व किंमत किती आहे हे सिद्ध होते, असे ते म्हणाले.

उदय सामंत यांनी यावेळी मनसे व महाविकास आघाडीच्या संभाव्य आघाडीवरही भाष्य केले. राज्यात सध्या मनसे महाविकास आघाडीत जाण्याची चर्चा सुरू आहे. पण राज ठाकरे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अवमान करणाऱ्या राहुल गांधींसोबत जातील की नाही हे मला माहिती नाही. पण त्यांची आघाडी झाली तर राज ठाकरे हे राहुल गांधींना केव्हा ना केव्हा प्रश्न विचारतील की, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी तुमची भूमिका काय? असे ते यावेळी आगामी विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीचाच विजय होणार असल्याचा दावा करताना म्हणाले.

विधानसभा निवडणुकीत लोकांनी कुणाला निवडून द्यायचे हे ठरवले होते. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही त्यांनी हे ठरवले आहे. त्यामुळे कुणी कितीही आघाड्या केल्या तरी काही फरक पडणार नाही. मत चोरले हे काँग्रेस व उद्धव सेनेला उशिराने सूचलेले शहाणपण आहे. लोकसभेच्या निवडणुकीनंतर आमचेच सरकार येणार म्हणून महाविकास आघाडीतील अनेक नेत्यांना मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न पडत होते. काहींनी तर कोट शिवले होते. पण त्यांचा टांगा पलटी झाला. आता त्यांनी ईव्हीएमवरून गदारोळ सुरू केला आहे, असा चिमटाही उदय सामंत यांनी यावेळी काढला.

## मुंबई महापालिका निवडणुकीसाठी नवाब मलिकांवर मोठी जबाबदारी

**मुंबई :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना गती मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात नवाब मलिक यांचा पुनःप्रवेश झाला आहे. आतापर्यंत या गटापासून दूर राहिलेले मलिक यांना आता मुंबई निवडणूक व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली असून, ही महत्त्वाची भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी त्यांच्याकडे सोपवली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस आगामी मुंबई महानगरपालिका निवडणूक नवाब मलिक यांच्या अध्यक्षतेखालील निवडणूक व्यवस्थापन समितीच्या नेतृत्वाखाली लढवणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री आणि ज्येष्ठ नेते नवाब मलिक यांच्यावर मुंबई निवडणूक व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली असून, याबाबतची अधिकृत माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनिल तटकरे यांनी दिली आहे.

'राष्ट्रवादी काँग्रेसची मुलुखमैदान तोफ' अशी ओळख असलेले, तसेच पक्षाचे मुंबई अध्यक्षपद भूषवलेले ज्येष्ठ नेते नवाब मलिक यांच्यावर आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी त्यांना मुंबई निवडणूक व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदाची धुरा दिली आहे.

मुंबई निवडणूक व्यवस्थापन समितीमध्ये नवाब मलिक यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई कार्याध्यक्ष शिवाजीराव नलावडे, मुंबई कार्याध्यक्ष सिध्दार्थ कांबळे, आमदार सना मलिक-शेख, माजी आमदार झिशान सिद्दीकी, प्रदेश सरचिटणीस संतोष धुवाळी, प्रदेश उपाध्यक्ष भास्कर विचारे, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे, राजू घुगे यांची तर निमंत्रित म्हणून दक्षिण जिल्हाध्यक्ष महेंद्र पानसरे, उत्तर - पश्चिम मुंबई जिल्हाध्यक्ष अजय विचारे, उत्तर - मध्य मुंबई जिल्हाध्यक्ष अर्शद अमीर, उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष इंद्रपाल सिंग, ईशान्य मुंबई जिल्हाध्यक्ष सुरेश भालेराव आदींचा समावेश आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १४ ऑगस्ट २०२५

## राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात " हर घर तिरंगा "उपक्रमांतर्गत १३ आगस्ट ते १५ ऑगस्ट विविध उपक्रमाचे आयोजन




**करमाड :** राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे शासकीय ध्येयधोरनानुसार आज आझादि का अमृत महोत्सव अंतर्गत " हर घर तिरंगा "उपक्रमांतर्गत १३ आगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे या निमित्ताने आज दिनांक १३ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी आठ वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस एस मुळे यांच्या हस्ते धोजारोहन करण्यात आले.व तिरंगा रॅली काढण्यात आली. सुरुवातीला भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या प्रतीमेला प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर डॉ. अस्विनीकुमार चिंचोलीकर व सहकार्यांनी राष्ट्रध्वजाला सलामी दिली. यावेळी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. हा राष्ट्रीय कार्यक्रम यशवी करण्यासाठी डॉ. बाळासाहेब लिहिणार,डॉ. नरेश डहाळे,डॉ. कालिदास फड डॉ. लक्ष्मण दांडगे,डॉ. जयश्री पाटील, प्रा.ज्ञानेश्वर लांडगे, प्रा. गणेश कुऱ्हाडे, प्रा. अर्जुन चव्हाण, डॉ. सुखदेव पोटदुखे, प्रा. हरिदास होळकर, डॉ. इम्रान पठाण,डॉ किशोर काळे,भगवंत देशपांडे,अविनाश साळवे, कैलास जाधव,ज्ञानेश्वर जाधव, मधुकर राठोड प्रा. राऊत, आदीनी परिश्रम घेतले..

## शिवाजी महाविद्यालयात डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती साजरी



**कन्नड :** १२ ऑगस्ट २०२५ वार मंगळवार रोजी शिवाजी महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाच्या वतीने भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांची जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य भोसले हे होते. याप्रसंगी डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून व पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.संतोष देशमुख यांनी सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला. डॉ. एस. आर. रंगनाथन यांची ग्रंथालय पंचसूत्री सर्व जगभर ग्रंथालयासाठी वापर होताना दिसतो. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. व्हि. एन. भोसले यांनी राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या व ग्रंथ हेच मानवाचे गुरु असतात त्यामुळे प्रत्येकाने ग्रंथाच्या सहवासात राहिले पाहिजे असे प्रतिपादन केले. आपले ग्रंथालय याच तत्वानुसार चालत असून ग्रंथालयाद्वारे दिल्या जाणाऱ्या अद्यावत सेवांचा विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. बी.के.मगर तसेच महाविद्यातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रंथालय कर्मचारी श्री केशव डेंगळे यांनी परिश्रम घेतले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## भारतीय नागरिकांनी राष्ट्रध्वजाचा मान-सन्मान राखलाच पाहिजे - प्रा. डॉ. सायबण्णा घोडके




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारतीय स्वातंत्र्यलढ्यात राष्ट्रध्वजाची कल्पना ही राष्ट्रीय एकात्मता, स्वाभिमान आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षेचे प्रतीक म्हणून उदयास आली. सन १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धानंतर देशात स्वातंत्र्याची लाट निर्माण झाली. त्या काळात एकसंध राष्ट्रीय ध्वज नव्हता. २२ जुलै १९४७ रोजी संविधानसभेने सध्याचा राष्ट्रध्वज स्वीकारला. या राष्ट्रध्वजाचा प्रत्येक नागरिकांनी मान-सन्मान राखलाच पाहिजे, असे प्रतिपादन राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. सायबण्णा घोडके यांनी केले. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हरघर तिरंगा अभियानांतर्गत बुधवारी (ता. १३) रोजी प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. घोडके म्हणाले की, राष्ट्रध्वजाचे महत्त्व केसरी : साहस, त्याग, नि:स्वार्थता, पांढरा : सत्य, शांती, प्रामाणिकपणा, हिरवा : समृद्धी, शेती, प्रगती, अशोक चक्र : न्याय, धर्म, सतत गतीशीलता व प्रगती असून राष्ट्रध्वज हा आपल्या राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असून तो स्वातंत्र्य, लोकशाही व सार्वभौमत्वाची आठवण करून देत राष्ट्रध्वजाचा पूर्व इतिहास विस्ताराने त्यांनी या वेळी मांडला. अध्यक्षीय समारोपप्रसंगी डॉ. सपाटे यांनी राष्ट्रीय प्रतीके आणि आपल्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास कायम स्मरणात ठेवला पाहिजे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रताप सिंग राजपूत यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अशोक बावगे तर आभार डॉ. रवी आळंगे यांनी मानले. यावेळी विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १४ ऑगस्ट २०२५


## कालिकादेवी विद्यालयात,"हर घर तिरंगा २०२५" मोहिम मोठ्या उत्साहात संपन्न



**शिरूर कासार :** दि.१३ ऑगस्ट २०२५ बुधवार रोजी आदर्श शिक्षण संस्था, बीड द्वारा संचलित,कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.) येथे महाराष्ट्र शासणाच्या आदेशानुसार, आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत,"हर घर तिरंगा २०२५" मोहिम मोठ्या ऊत्साहात संपन्न झाली. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते भारतीय तिरंगा या राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले असून सामुदायिक राष्ट्रगीत घेण्यात आले.यावेळी प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी 'भारतीय स्वातंत्र्य दिना' निमित्त शुभेच्छा देतांना सांगितले की,'आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या क्रांतिवीरांचे आपण सर्वांनी स्मरण करून त्यांच्याप्रति ॠण व्यक्त करावे'.आपल्या स्वातंत्र्याचे दर्शन घडवण्यासाठी तिरंगा ध्वज आणून तो प्रत्येकाने आपल्या घरावर फडकविण्यात यावा.असा एक महत्त्वाचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.त्यानंतर शालेय पातळीवर शासनाच्या mkcl विभागाच्या निर्देशानुसार "स्वातंत्र्य दिन प्रश्नमंजुषा" ही स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. यासाठी विद्यार्थ्यांना २० मिनिटात, सामान्यज्ञान या विषयावरील एकूण २५ प्रश्नाची स्पर्धा परीक्षा घेण्यात आली.ही प्रश्नमंजुषा परीक्षा अतिशय पारदर्शक व का◌ॅपीमुक्त घेण्यात आली. विशेषत: स्पर्धा परीक्षा चालू असतांना प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी स्वत:लक्ष दिले असून, खुल्या मैदानावर आणि सर्व प्राध्यापक व शिक्षकांच्या निरीक्षणाखाली पार पडली आहे. या प्रश्नमंजुषा परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त व मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता. यावेळी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे,प्रा.महारूद्र डोंगरे,विज्ञान प्रमुख प्रा.संजय काकडे,परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे,क्रीडा प्रमुख श्री रविंद्र बडे, प्रा.बाळासाहेब खटाणे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डा◌ॅ.आत्माराम झिंजुर्डे,प्रा.विश्वास ढाकणे,प्रा.संजय आव्हाड, प्रा.अनिल जरे,प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.महादेव हांगे,प्रा.बिभिषण घायाळ,प्रा.नारायण तांबे, प्रा.दत्ता शिंदे,प्रा.लक्ष्मण गव्हाणे,प्रा.दत्ता गायकवाड,प्रा.विनोद गलांडे,प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.शशिकांत जावळे,प्रा.अशोक घोडके,प्रा.सत्यनारायण ढवळे, प्रा.हनुमंत घायाळ,प्रा.सविता दराडे,प्रा.रेखा निर्मळ,प्रा.सिमा ढवळे,सौ,अनिता लाटे,आबासाहेब ढवळे,वसंत आहेर,राजू बडे,जयेंद्र निकम,आप्पासाहेब कांबळे, नितीन बहिर,प्रकाश साऊत,रविंद्र शिंदे तसेच प्राध्यापक,शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.






## इकरा पब्लिक शाळेत तब्बल ३५० फूट तिरंगा रॅली; 'विविधता मे एकता'ची दिली हाक




**मोहाडी जळगाव :** देशभक्तीची भावना जनमानसात जागृत करण्यासाठी तसेच तिरंग्याबद्दल आत्मियता निर्माण करण्याच्या उद्देशाने इकरा पब्लिक शाळेच्या वतीने "हर घर तिरंगा" या उपक्रमांतर्गत तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. बुधवार 13 ऑगस्ट रोजी दुपारी 3 वाजता इकरा बी.एड कॉलेज येथून या रॅलीला मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करण्यात आली. रॅलीचा समारोप बी.यू.एम.एस मैदानावर झाला. रॅलीमध्ये पालकांसह,शाळेचे शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, बस चालक यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. तिरंगा हातात घेऊन, देशप्रेमाने भारावलेल्या वातावरणात शाळेच्या रस्त्यांवरून निघालेली ही रॅली नागरिकांच्या मनावर देशप्रेमाचा ठसा उमटवून गेली. या रॅलीत शेख शकील, डॉ. इरफान शेख, सईदा मॅडम, अजीम शेख ,शालेय विद्यार्थी आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी यांच्यासह सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्स्फूर्तपणे भाग घेतल्याने रॅलीला भव्य स्वरूप प्राप्त झाले. ही रॅली यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व कर्मचारी यांचे विशेष योगदान लाभले. या सर्वांनी रॅलीच्या नियोजनापासूनच अंमलबजावणी पर्यंत परिश्रम घेतले.

## कला महाविद्यालय बिडकीन येथे आंतरराष्ट्रीय युवा दिन विविध कार्यक्रमाने संपन्न



**बिडकीन :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला महाविद्यालय बिडकीन ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयामध्ये दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी हर घर तिरंगा अभियान रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅली अतिशय उत्स्फूर्तपणे पार पडली. त्याचबरोबर रांगोळी स्पर्धा हर घर तिरंगा या थीम खाली संपन्न झाली व आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या आदरणीय साधना गंगावणे मॅडम जिल्हा कार्यक्रम अधिकारी एड्स प्रतिबंधक नियंत्रण पथक जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजी नगर यांना निमंत्रित करण्यात आले होते त्यांच्या हस्ते रेड रिबीन क्लब उद्घाटन ,रांगोळी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले तदनंतर आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त कार्यक्रमाचे प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.रमेश गायकवाड यांनी केले. तदनंतर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या गंगावणे मॅडम यांनी आपल्या व्याख्यानात महाविद्यालयातील तरुण-तरुणी युवा हे देशाचे भविष्य असून या महाविद्यालयातूनच सामाजिक ,धार्मिक, आर्थिक ,राजकीय क्षेत्रामध्ये या चेहऱ्यांना संधी मिळते व हेच युवा वेगवेगळ्या क्षेत्रात आपला ठसा उमटू शकतात हे सांगताना त्यांनी एड्स प्रतिबंधक कायदा व युवा सुरक्षित राहण्यासाठी घ्यावयाची काळजी व युवक युवतींची जबाबदारी काय आहे याचे अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले.आणि एड्स सारख्या महाभयंकर रोगा विषयी सविस्तर माहिती दिली त्याचबरोबर या कार्यक्रमाचा उद्देश युवा शक्ती आणि त्यांच्या समस्या यावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले .कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन आहेर सर यांनी भूषवले त्यांनी आपल्याच महाविद्यालयातील हे विद्यार्थी विद्यार्थिनी भावी जीवनामध्ये आपल्या समाजाचे आधारस्तंभ व विविध क्षेत्रांमध्ये करिअर घडवण्यासाठी महाविद्यालयातूनच व्यासपीठ त्यांना मिळत असते. म्हणून आपले महाविद्यालय सातत्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन नेहमीच करत असते असे प्रतिपादन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अतिशय सुंदर पद्धतीने खेळीमेळीच्या वातावरणात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. मिलिंद ठोकळे यांनी केले . रांगोळी स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. शेख मुखत्यार सर , डॉ. अर्चना काटकर मॅडम, डॉ. प्रसाद करंदीकर सर यांनी काम पाहिले. यशस्वी विद्यार्थ्यांना रोख बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले या कार्यक्रमाला चौबे सर ग्रामीण रुग्णालय बिडकीन हे उपस्थित होते व शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आयक्यूएसी विभागाचे डॉ. रामकिसन मुंडे यांनी केले व शेवटी विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १४ ऑगस्ट २०२५


## कचरा संकलन व व्यवस्थापनाच्या निविदा प्रक्रियेत अनियमितता - अंबादास दानवे



**मुंबई :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत कचरा संकलन व व्यवस्थापनाकरिता जाहीर करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत गंभीर व संशयास्पद अनियमितता झाल्याचे उपलब्ध कागदोपत्री नोंदींवरून स्पष्ट दिसून येत असल्याने याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी राज्याचे विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे केली आहे.

सदर प्रक्रियेत स्पर्धा मर्यादित करून काही मोजक्या कंपन्यांच्या सोयीस अनुकूल अटी-शर्ती समाविष्ट करण्यात आलेला आहे. निविदेसाठी प्रारंभी निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत एकाही कंपनीने अर्ज सादर केलेला नव्हता. तथापि, तद्नंतर काही अटी-शर्तीमध्ये बदल करून मुदतवाढ देण्यात आली आणि त्यानंतर केवळ तीन कंपन्यांनीच एकाच दिवशी व अल्प वेळेच्या अंतरात प्रस्ताव सादर केले. यामध्ये जिगर ट्रान्सपोर्ट कंपनी यांनी दिनांक ४ ऑगस्ट रोजी दुपारी १२.०७ वाजता निविदा सादर केली. वेस्टर्न इमेंजिनरी ट्रान्सकॉर्न प्रा. लि. यांनी दिनांक ४ ऑगस्ट रोजी दुपारी १२.२२ वाजता निविदा सादर केली. ओम स्वच्छता कॉर्पोरेशन प्रा. लि. यांनी दिनांक ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ०४.२३ वाजता निविदा सादर केली, असल्याची माहिती दानवे यांनी पत्रात दिली आहे.

वरील वेळापत्रकावरून तिन्ही कंपन्यांमध्ये परस्पर संगनमत करून निविदा भरण्यात आल्याचे निदर्शनास येत आहे. विशेष म्हणजे या तिन्ही कंपन्या गुजरात राज्यात कार्यरत असून, यापैकी ओम स्वच्छता कॉर्पोरेशन प्रा.लि. या कंपनीच्या प्रतिनिधीने अब्दुल अन्वर सत्तार या नावाच्या व्यक्तीच्या मध्यस्तीने पालकमंत्री यांची भेट घेऊन त्यांच्या सोयीच्या अटी-शर्ती निविदेत समाविष्ट करण्यासंबंधी प्रभाव टाकलेला आहे. तसेच मागील कराराच्या काळात कार्यरत असलेले उपायुक्त नंदकिशोर भाँबे हे अधिकारी सात वर्षांनी पुन्हा याच निविदेच्या काळात त्याच पदावर बदली करून आलेले आहेत. प्री-बिड बैठकीत २२ कंपन्या उपस्थित असताना अंतिम निविदेसाठी केवळ तीन कंपन्याच राहिल्या असून त्या सर्व गुजरात राज्यातील आहेत, ही बाब संशयास्पद असल्याचे अंबादास दानवे यांनी पत्रात म्हटले आहे.

विशेषत: निविदेत एप्रिल २०२५ नंतर नोंदणीकृत केलेल्या गाड्या घेणे आवश्यक असताना संबंधित गुजरातमधील कंपनीकडे एप्रिल २०२४ मध्ये नोंदणीकृत गाड्या उपलब्ध असल्याने, त्या कंपनीस थेट पात्रता मिळावी या हेतूनेच ही अट ठेवण्यात आलेली आहे. ही बाब अन्य संभाव्य स्पर्धक कंपन्यांना अपात्र ठरवून स्पर्धा मर्यादित करण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट होत असल्याचे दानवे पत्रात सांगितले.

सन २०१७ ते फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रती दिवस ६०० टन कचरा संकलनासाठी २२५ कोटी रुपयांचा करार झाला होता. सद्य:स्थितीत संकलनाचे प्रमाण तेवढेच असून, सन २०२६ च्या करारासाठी निविदेची किंमत ६०० कोटी रुपये निश्चित करण्यात आली असून अंतिम टप्प्यापर्यंत सदरहू किंमत १००० कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. सदरहू वाढ कोणत्याही तर्कसंगत खर्च-विश्लेषणास धरून नाही. विद्यमान करार २०२६ पर्यंत वैध असून, विस्ताराची तरतूद असताना देखील नवीन निविदा मागवण्यात आल्यामुळे निर्णयप्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत गंभीर शंका उपस्थित होत, असल्याची बाब अंबादास दानवे यांनी अधोरेखित केली आहे.

VTMS प्रणालीचा अनुभव मागविताना सुरुवातीस १,४८,००० मालमत्तांच्या सर्व्हेचा अनुभव मागवण्यात आला होता. त्या अनुषंगाने सदरहू मालमत्तेचा सर्व्हे प्रभाग निहाय दोन किंवा तीन एजन्सीच्या माध्यमातून करता येणे शक्य होते, तथापि, प्री-बिडनंतर २,९६,००० असा करण्यात आला असून ही प्रणाली महाराष्ट्रात नसून केवळ गुजरातमध्ये कार्यरत आहे. तसेच RTS व MRF चा एकत्रित अनुभव या तीन कंपन्यांकडे आहे. सेवा-मानकांच्या निकषांमध्ये प्री-बिडनंतर शिथिलीकरण (शंभर टक्के वर्गीकरण व पाच टक्के दंडाऐवजी पंच्याण्णव टक्के वर्गीकरण व तीन टक्के दंड) या सर्व बाबी ठेकेदार पक्षास अनुकूल असून सार्वजनिक हिताच्या विरुद्ध असल्याची माहिती दानवे यांनी दिली आहे.

## डॉ. एस. आर. रंगनाथन जयंती निमित्त पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन



**कन्नड :** दि. १२ ऑगस्ट कन्नड येथील संत तुकाराम महाविद्यालयात ग्रंथालय विभागाअंतर्गत भारतीय ग्रंथालयशास्त्र चे जनक डॉ.एस.आर. रंगनाथन यांच्या जयंती निमित्त विद्यार्थांसाठी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले होते. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो. डॉ. सुनीता शिंदे देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी सर्व महाविद्यालयातील विद्यार्थींनी या ग्रंथ प्रदर्शनाला भेट द्यावी असे आवाहन केले. महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. के. जी. मगर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या विविध विषयांवरील ग्रंथांची माहिती जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याचे श्री मगर यावेळी म्हणाले. ग्रंथ प्रदर्शनाला विद्यार्थ्यां-विद्यार्थीनी, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी महाविद्यालयातील इंग्रजी विभागाच्या विद्यार्थांनी डॉ. संतोष प्रसाद यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या भित्तीपत्रकाचे विमोचन प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT

X-RAY | C.T.-SCAN

E.C.G. | Radiology

Physiotherapy | Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact: 9405109103 8830838903



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002